# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ /४५६७/२०२५/सातारा

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| संजय नारायण सातपुते | गट शिक्षणाधिकारी (शिक्षण विभाग), पंचायत समिती वाई जि. सातारा | गट विकास अधिकारी पंचायत समिती वाई जि. सातारा |

**(सुनावणी दिनांक- ११.०८.२०२६ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि. २९.१०.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये संपूर्ण माहिती दिली नाही असे नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हजर आहेत तथापी रोजनाम्यावर स्वाक्षरी केली नाही, विद्यमान तथा तत्कालीन जन माहिती अधिकारी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागीतलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| २१.०८.२०२५ | पदवीधर प्राथमिक शिक्षक गोपनीय अभिलेख सन २००६-०७ ते २००९-१० सत्यप्रती, अतिउत्कृष्ट कामाची माहिती तक्ता व गोपनीय अहवाल प्रतवारी तक्ता भरुन मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी असे कथन केले की, " माहिती मिळाली नाही " त्यावर जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, " दोन वर्षाचे गोपनीय अभिलेख दिले आहेत. सन ०९-१० चा गोपनीय अभिलेख मिळाला नाही. "

उपलब्ध अभिलेखांच्या पाहणीतून, अपिलार्थी यांनी माहिती अर्जामध्ये मागणी केल्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि. ०२.०९.२०२५ च्या पत्रासोबत सन २००७-२००८ व सन २००८-२००९ चे गोपनीय अहवाल दिल्याचे दिसून येते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०१.१०.२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना सर्व उपलब्ध माहिती विनामुल्य पुरविण्याचे आदेश देऊन अपिल निकाली काढल्याचे दिसून येते. प्रथम अपिल आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि. ०९.१०.२०२५ चे पत्रान्वये अभिलेख उपलब्ध नाही असे कळविल्याचे दिसून येते. सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेल्या लेखी निवेदनामध्ये श्री. सातपुते यांचा सन २००६-०७ चा गोपनीय अहवाल उपलब्ध झाला असून तो त्यांना आयोगाकडील सुनावणीवेळी देण्यात येत आहे, असे नमूद केले आहे. वास्तविक पहाता गोपनिय अभिलेख हे कायमस्वरुपी जतन करावयाचे अभिलेख असल्याने ते गहाळ होणे अथवा उपलब्ध नसणे ही बाब गंभीर स्वरुपाची आहे.

प्रकरणी अपिलार्थीस माहितीचे पुर्ण प्रदान झाले नाही.

सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८)(क)(दोन) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी पंचायत समिती वाई, जि. सातारा यांना या प्रकरणी जनमाहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असुन त्यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थींने जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने दिलेली माहिती वगळून उर्वरित माहिती २००९-१० वर्षाचे गोपनीय अहवाल आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांचे आत अभिलेखामध्ये शोध घेऊन अपिलार्थीस कलम ७(६) नुसार व्यक्तीश: विनामुल्य उपलब्ध करून द्यावे. गोपनीय अहवाल आढळ न झालेस तो संबंधितांकडून नव्याने लिहून व त्याची आवश्यक ती कार्यवाही पुर्ण करुन त्याची प्रत अपिलार्थी यांना देणेत यावी व पुर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र.रामाआ /४५६७/२०२५/सातारा 4322 दिनांक - 23/9/26.